जागतिक आव्हाने पेलण्यासाठी भूगोल शास्त्रज्ञांची भूमिका महत्त्वाची

उपसंचालक डॉ एफ.एम.नदाफ : पार्वतीबाई चौगुले महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. १८ : हवामान बदल, शहरी नियोजन, किनारपट्टी व्यवस्थापन आणि संसाधन शाश्वतता यांसारख्या जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी भूगोलशास्त्रज्ञांची भूमिका महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन उच्च शिक्षण संचालनालयाचे उपसंचालक आणि बोर्डा सरकारी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एफ.एम.नदाफ यांनी केले.

पार्वतीबाई चौगुले महाविद्यालयातील भूगोल आणि संशोधन केंद्राने आयोजित केलेल्या भौगोलिक संशोधनातील साधने आणि तंत्रे या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात उद्घाटक या नात्याने प्राचार्य डॉ. एफ.एम. नदाफ बोलत होते.

यावेळी पार्वतीबाई चौगुले महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा. संगीता जी. सांखळकर, परिषदेचे आयोजन सचिव डॉ. एड्रियन फेरो आणि डॉ. संजय गायकवाड, भूगोल विभागप्रमुख आणि प्राध्यापक डॉ. नंदकुमार सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

भौगोलिक संशोधन पद्धतींमधील नवीनतम प्रगती आणि वास्तविक जगातील समस्या आणि त्यावरील उपाय यावर चर्चा करण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

प्राचार्य डॉ एफ.एम. नदाफ म्हणाले की, शाश्वत उपाय तयार करण्यासाठी भौगोलिक साधनांचा योग्य वापर महत्त्वाचा आहे. भौगोलिक संशोधनाच्या आंतरविद्याशाखीय स्वरूपावरही प्राचार्य डॉ नदाफ यांनी यावेळी प्रकाशझोत टाकला.

भूगोलशास्त्रज्ञांचा आंतरविद्याशाखीय समूह गरजेचा : डॉ. सावंत

भूगोल विभागाच्या दृष्टिकोनावर प्रकाश टाकताना, भूगोल विभागप्रमुख आणि प्राध्यापक डॉ. नंदकुमार सावंत यांनी प्रगत तपास साधनांद्वारे प्रादेशिक गतिशीलता समजून घेण्यासाठी भूगोलशास्त्रज्ञांचा एक आंतरविद्याशाखीय समुदाय तयार करण्याचे आवाहन केले.

राष्ट्रीय परिषदेतील ठळक बाबी

बीट्स गोवा कॅम्पस येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. राजीव चतुर्वेदी यांनी हवामान बदलाच्या परिणामांचे आणि भविष्यातील मार्गांचे मूल्यांकन करण्यासाठी दीर्घकालीन देखरेखीचे महत्त्व स्पष्ट केले. परिषदेतील चर्चासत्रांमध्ये लवचिक आणि शाश्वत भविष्यासाठी पुराव्यावर आधारित उपायांना चालना देण्यात भूगोलाची परिवर्तनकारी भूमिका अधोरेखित करण्यात आली. भौगोलिक शिक्षण आणि संशोधनात सतत गुंतवणूक, शैक्षणिक आणि उद्योग यांच्यातील सहकार्य वाढवणे आणि अवकाशीय विश्लेषणात प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब यावरील एकमताने परिषदेचा समारोप झाला.

देशभरातील ६० प्रतिनिधी आणि ३० शोधनिबंधांचे सादरीकरण

या परिषदेला गोवा आणि गोव्याबाहेरील ६० प्रतिनिधींनी सहभाग घेतला, ज्यांनी भू-स्थानिक तंत्रज्ञान अनुप्रयोग, भू-वापर नियोजन, हवामान अनुकूलन धोरणे आणि शाश्वत शहरी विकास यासारख्या विविध विषयांवर ३० संशोधन निबंध सादर केले.

शिक्षकांचे निरंतर प्रशिक्षण राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्त्वपूर्ण गाभा

टीम दैनिक हेराल्ड

▶ सचिव प्रसाद लोलयेकर : पर्वरीत 'परख' कार्यशाळेचे उद्घाटन

पर्वरी, दि. १८ : राष्ट्रीय स्तरावर शैक्षणिक क्षेत्रात समतुल्य मानांकन प्राप्त करण्यासाठी स्मार्ट पायाभूत सुविधा आवश्यक आहेत पण त्याहीपेक्षा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी स्मार्ट अध्यापकाची आज नितांत आवश्यकता आहे . 'परख' च्या माध्यमातून असे दर्जेदार अध्यापक घडविण्याची प्रक्रिया सुरू राहण्यासाठी शिक्षकांचे निरंतर प्रशिक्षण राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्त्वपूर्ण गाभा आहे, असे उद्गार शिक्षण सचिव प्रसाद लोलयेकर यांनी काढले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राज्यात प्रभावीपणे लागू करण्याचा एक भाग या नात्याने गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ अंतर्गत तसेच परख-राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद,दिल्ली यांच्या पुढाकाराने सर्वांगीण प्रगती पत्रक व प्रश्नपत्रिकेचे मानक प्रारूप या विषयावर चार दिवसांच्या राज्यस्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या आल्त-पर्वरी येथील प्रशस्त सभागृहात आयोजित करण्यात आले. त्यावेळी अध्यापक वर्गाला संबोधित करताना शिक्षण सचिव प्रसाद लोलयेकर यांनी राष्ट्रीय स्तरावर गोमंतकीय विद्यार्थी अग्रेसर राहण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळांतून सकारात्मक विचारमंथन व्हावे ही अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी व्यासपीठावर परखचे तज्ञ व्याख्याता विवेक गुप्ता तसेच गोवा माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाचे अध्यक्ष भगीरथ शेट्ये हे उपस्थित होते. शेवटच्या पायरीवर असलेल्या विद्यार्थ्याला देखील पुढे येण्यासाठी मदत करून त्याचे जीवन सर्वांगाने परिपूर्ण करणे हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्वपूर्ण उद्देश आहे व तो सफल होण्यासाठी शिक्षकांचे योगदान असाधारण ठरणार आहे याची जाणीव अध्यापकवर्गाने ठेवून विद्यार्थीपरायण वृत्तीने राहावे असे आवाहन केले.

जागतिक स्तरावर टिकून राहण्यासाठी घोकंपट्टीने स्मरणशक्तीच्या जोरावर विषय लक्षात ठेवण्यापेक्षा कौशल्यपूर्ण वृत्तीने तो आपल्या जीवनात उपयोजित करणे याला एकंदरीत शैक्षणिक प्रक्रियेत महत्व दिले पाहिजे असे मत परखचे तज्ञ व्याख्याता विवेक गुप्ता यांनी व्यक्त केले.

कार्यशाळेला आभासी पद्धतीने संबोधित करताना परखच्या प्रकल्प संचालक तसेच समन्वयक प्राध्यापिका इंद्रायणी भदौरिया यांनी देशातील शैक्षणिक प्रणालीला अधिक समावेशक,लवचिक आणि जागतिक बनविण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांनी आपले ज्ञान अद्यावत राखण्याची गरज प्रतिपादित केली.

त्याचप्रमाणे भा.प्र.से., अतिरिक्त सचिव, शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग,शिक्षण मंत्रालयाचे आनंदराव पाटील यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० विषयी आपले विचार आभासी पटलावरून मांडले.

इनोव्हेटिव्ह आयडिया चॅलेंज २०२५ उत्साहात

▶ कन्व्हर्ज २.० अंतर्गत मडगाव येथे आयोजन; विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसाद

टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. १७ : उच्च शिक्षण संचालनालय, पर्वरी आणि गोवा सरकारच्या स्टार्टअप आणि आयटी प्रमोशन सेलच्या सहकार्याने गोवा राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय कौशल्यांची वाढ व्हावी यासाठी कन्व्हर्ज २.० अंतर्गत इनोव्हेटिव्ह आयडिया चॅलेंज २०२५ चे आयोजन रवींद्र भवन मडगाव येथे करण्यात आलेले होते. राज्यातील विद्यार्थ्यांकडून या कार्यक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. राज्यातील विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय प्रतिभेला अधिक व्यापक प्रमाणात चालना मिळावी यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर, कन्व्हर्ज आणि इनोव्हेटिव्ह आयडिया चॅलेंजचे मुख्य समन्वयक डॉ. नियॉन मार्शेन, उच्च शिक्षण संचालनालयातील सहायक प्राध्यापक प्रशांत एस भोमकर, स्टार्टअप आणि आयटी प्रमोशन सेल गोवाचे सीईओ डी.एस.प्रशांत आदी मान्यवर उपस्थित होते.

मडगाव: इनोव्हेटिव्ह आयडिया चॅलेंजमधील विजेत्या संघासोबत उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर, कन्व्हर्जचे मुख्य समन्वयक डॉ. नियॉन मार्शेन व मान्यवर.

विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवणे, सर्जनशील विचारसरणी आणि बाजारपेठेला आवश्यक असणाऱ्या उद्योजकीय कल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी फेब्रुवारी २०२५मध्ये इनोव्हेटिव्ह आयडिया चॅलेंज २०२५ची स्थापना करण्यात आली. या अतंर्गत विविध टप्प्यांत उद्योजकीय कल्पना सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. या अंतर्गत इनोव्हेटिव्ह आयडिया चॅलेंज २०२५मध्ये ४० शैक्षणिक संस्थांमधील ९७ विद्यार्थी संघांनी सहभाग घेतला. त्यातील १० संघ अंतिम फेरीसाठी निवडण्यात आले. अंतिम फेरी १३ मार्च रोजी रवींद्र भवन मडगाव येथे आयोजित करण्यात आली होती.

उद्योजकीय कल्पना सादरीकरण स्पर्धेत धेंपे महाविद्यालयाची बाजी

उद्योजकीय कल्पना सादरीकरण स्पर्धेत धेंपे कला आणि विज्ञान महाविद्यालय, मिरामारमधील ऑटोनॉमस स्विमिंग पूल क्लीनर या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. यामध्ये राहुल पाटील, रोशेल डिसोझा, अभिष्का तौरो आणि गजेंद्र चौबे या विद्यार्थ्यांचा समावेश होता.पीसीसीई आणि एआयटीडी येथील नोव्हा हसलर्स या संघाने दुसरा क्रमांक पटकाविला. यामध्ये यश पेडणेकर आणि गौतमी कृष्णा यांचा सहभाग होता. तर तिसरा क्रमांक पीईएस कला आणि विज्ञान महाविद्यालयाच्या अनुकूल संघाने पटकाविला. यामध्ये गायत्री नाईक, सेजल पोपकर, गोवर्धन नाईक आणि श्वेता गावडे यांचा सहभाग होता.

इनोव्हेटिव्ह आयडिया चॅलेंज काय आहे?

गोवा सरकारच्या स्टार्टअप आणि आयटी प्रमोशन सेलच्या सहकार्यातून उच्च शिक्षण संचालनालयाने राज्यात विद्यार्थी केंद्रित नवोपक्रमांना प्रोत्साहान देण्यासाठी इनोव्हेटिव्ह आयडिया चॅलेंज ही संकल्पना आखलेली आहे. तरुण उद्योजकांना मार्गदर्शन, संसाधने आणि नेटवर्किंग संधी उपलब्ध करून स्पर्धात्मक व्यवसाय युगात यशस्वी होण्यासाठी आवश्यक साधनांसह सुसज्ज करणे हा इनोव्हेटिव्ह आयडिया चॅलेंजचा महत्त्वाचा उद्देश आहे.

भाषेचे पालन करणे प्रत्येकाचे कर्तव्य

▶ ॲड. शिवाजी शिंदे : पार्सेकर महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. १८ : आपल्या मातृभाषेच्या सुंदरतेचा आणि महत्त्वाची ओळख देणारा मराठी भाषा गौरव दिन हा दिवस आहे. आपण भाषा जोपासतो म्हणजे केवळ भाषेचे आदर करतो असे नसते, तर आपल्या संस्कृतीचे, परंपरेचे आणि एकात्मतेचे संरक्षण देखील करतो. भाषा केवळ संवादाचे साधन नसून ती आपली ओळख, आपली धारा आहे. ज्या भाषेवर आपला समाज, संस्कृती आणि आपली परंपरा आधारलेली आहे, त्या भाषेचे पालन करणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले.

हरमल येथील गणपत पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी विभाग आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव तथा मराठी दक्षता अधिकारी डॉ. शिवाजी शिंदे यांनी प्रमुख पाहुणे नात्याने व्यक्त केले.

मराठी भाषेच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक महत्त्वावर भाष्य केले. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी समाजाच्या सर्व घटकांनी एकत्र येऊन कार्य करण्याचे आवाहन शिंदे यांनी केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत पार्सेकर, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. पांडुरंग पंडित, मराठी विभाग प्रमुख डॉ. गीता येर्लेकर व कार्यक्रम संयोजक डॉ. दुर्गेश माजिक उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रज यांच्या काव्यावर गीतात्मक संगीत कार्यक्रम सादर करून सभागृहात रंगत आणली. विद्यार्थ्यांनी आपल्या प्रस्तुतिकरणात मराठी भाषेची सुंदरता आणि गोडवा दाखवला. या सांस्कृतिक कार्यक्रमाला महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रमोद केरकर, तसेच विभाग सहकारी श्रद्धा धोंड यांचे सहकार्य लाभले. मराठी भाषा गौरव दिनाच्या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी शेजल तोरस्कर हिने केले.संयोजक डॉ. दुर्गेश माजिक यांनी आभार मानले.विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात रिया परब, प्रणीता नाईक, निकीता गांवकर, शुभम आंबेकर या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि संयोजन डॉ. दुर्गेश माजिक यांनी केले.

आगरवाड्यात ओहोळ अडवून बांधकाम!

▶ ग्रामस्थांची पंचायतीकडे तक्रार : कारवाईची मागणी

टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १७ : आगरवाडा चोपडे पंचायतक्षेत्रातील शापोरा नदी किनारी भागात असलेल्या एका मिठागराच्या परिसरात एक पारंपरिक ओहोळ आहे. त्या ओहोळाचे दोन्ही बाजूने संरक्षण भिंत उभारण्याचे काम जलसिंचन खात्याअंतर्गत लाखो रुपये खर्च करून करण्यात आले. हाच ओहोळ आणि पारंपरिक पायवाट एका बांधकाम व्यावसायिकांनी अडवण्याचा प्रयत्न केला. शिवाय याच ओहोळावर लोखंड टाकून त्यावर बांधकाम करण्याचा त्याचा प्रयत्न सुरू आहे.

या संदर्भात नागरिकांनी तक्रारी आगरवाडा पंचायतीकडे केल्या. आगरवाडा पंचायतीने याची दखल घेऊन जलसिंचन खात्याला पेडणे विभागाला पत्र लिहून या घटनेचा पंचनामा करण्याची मागणी केली. त्यानुसार जलसिंचन खाते पेडणे विभागाच्या अधिकाऱ्यांनी या परिसरात येऊन पाहणी केली व अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवला आहे. मात्र, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अजूनपर्यंत कोणत्याच हालचाली केल्या नसल्यामुळे नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. मिठागराच्या बाजूलाच हा जो ओहळ आहे, तो ओहळ अडवून जी पारंपरिक पायवाट आहे. ती पायवाटही प्रकल्प उभारणाऱ्या संबंधितांनी ग्रीन नेट लाकडी कुंपणे घालून अडून टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्या ठिकाणी कुणाला सहज जाता येत नाही. त्याठिकाणी सुरक्षारक्षक तैनात करण्यात आले आहेत. सरकारच्या आणि सार्वजनिक जागेमध्ये अशा प्रकारचे ओहोळावर बांधकाम करण्यासाठी वाटा अडवून टाकणे योग्य आहे का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

या संदर्भात आगरवाडा सरपंच हेमंत चोपडेकर यांच्याकडे संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की आम्ही जलसिंचन खात्याला कळवलेले आहे. जलसिंचन खात्याने त्या संदर्भात पंचनामाही केला आणि अधिकाऱ्यांना अहवाल पाठवलेला आहे. अहवाल आल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल. पंचायत या अडवलेल्या ओहळ खुला करण्यासाठी पंचायतही प्रयत्न करणार असल्याचे सरपंच चोपडेकर यांनी सांगितले.

जलसिंचन खाते पेडणे विभागाचे अधिकारी अनिल परुळेकर यांच्याकडे संपर्क साधला असता या घटनेचा पंचनामा केला असून अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवलेला आहे. तोपर्यंत काम बंद ठेवण्याचा आदेश आम्ही संबंधिताला दिलेला आहे. काम सध्या पूर्णपणे बंद आहे. वरिष्ठांचा अहवाल आल्यानंतर आम्ही योग्य ती कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

स्थानिक पंच संगीता नाईक यांच्याकडे संपर्क साधला ते म्हणाले, पंचायतीने योग्य ती कार्यवाही करण्यासाठी जलसिंचन खात्याला कळवलेले आहे. त्यानुसार जलसिंचन खात्याने मागच्यावेळी अधिकाऱ्यांसोबत या घटनेचा पंचनामा केलेला आहे. एखादा सार्वजनिक ओहोळ अडवून पारंपरिक पायवाट अडवणे योग्य नसल्याने भविष्यात संबंधितावर पंचायत देखील कारवाई करणार असल्याचे संगीता नाईक यांनी सांगितले.

मिठागर बुजवण्याचाही प्रयत्न होणार

ज्या परिसरात प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे, त्या परिसरात एक पारंपरिक मिठागर आहे. त्या मिठागरासहित जमीन विकत घेतलेली आहे. भविष्यात हा मिठागर बुजवण्याचाही प्रयत्न केला जाईल, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत. दरम्यान मागच्यावेळी चोपडे या ठिकाणी असाच मिठागर एक बुजवण्याचा प्रयत्न केला. मात्र सरकारने आजपर्यंत कसल्याच प्रकारची कारवाई केली नाही.

CHANGE IN NAME

I, **Shrimati. Mercedes Apolonia De Souza**, Resident of H NO 1215/1 2ND Bairo Segundo Bairo Santa Cruz Tiswadi , North Goa, 403005, Goa, INDIA, hereby change my name from **Mercela Appolina Dias /Mercedes Apolonia de Sousa e Dias** to **Mercedes Apolonia De Souza.** Hereafter in all my dealings and documents, my name will be known by **Mercedes Apolonia De Souza.**

CHANGE IN NAME

I **Anabela Regina Fonseca Afonso** h.no 923/57 near socorro village panchayat socorro porvorim bardez goa would like to correct my name from **Anabela Regina fonseca Alfonso e Dias** to **Anabela Regina Fonseca Afonso** herein after in all my dealings and documents I will be known by my new name **Anabela Regina Fonseca Afonso.**

CHANGE IN NAME

I **ZEENA SEVERINA LAVIA BARRETO** R/O HNO 583 PALMAR JUA SANTO ESTEVAM NORTH GOA HAS CHANGED MY NAME FROM **ZEENA ANDREW BARRETTO** TO **ZEENA SEVERINA LAVIA BARRETO** HEREAFTER IN ALL MY DEALINGS AND DOCUMENTS AND I WILL BE CALLED OR KNOWN BY THE NAME **ZEENA SEVERINA LAVIA BARRETO.**

NOTICE

My Mother **Late Anita Maria Rosada Rodrigues** was owning **Toyota Fortuner Car** bearing **Reg. No. GA-06-D-9006, Hyundai New Verna FI 1.6 CRDI Car** bearing **Reg. No. GA-06-E-9006 & Honda Activa Scooter** bearing **Reg. No. GA-06-H-8006.** After her death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Date: 18.03.2025 Sd/-
Elton Emmanuel Rodrigues
H.No. 21/3, Lane No. 10, Behind Cottage Hospital, Chicalim, Mormugao, South Goa 403711
Sandeep Ads

Transfer of Vehicle

I Kirthi K. Nayak, wife of Krishnanada Nayak (Marriage certificate unavailable as marriage was not registered) R/o 125A-6-1, Martawado, Cuchelim, Mapusa, Bardez, Goa wish to transfer the Hyundai i10 car bearing registration No. GA 03 P-1855 in my name which was registered in the name of my late husband Krishnananda Nayak.

Any person is/are having any objection to the said transfer of vehicle, should submit the same to The Asst. Director Transport, Mapusa, within 15 days of publication of the notice.

IN THE COURT OF JOINT MAMLATDAR VI OF BARDEZ TALUKA AT MAPUSA, GOA
Mutation Case No: 100325 Village: Parra

Cynthia Acanthe, R/o H. No. 4/21-A, Tabra Vaddo, Saligao, Bardez, Goa .....Applicant
V/s
1. Emilia Bella Lalita Abreo alias Emelia Bella Lalita Abreo 2. Gavin Nigel Rodrigues alias Gavin Rodrigues 3. Maria Helena Rodrigues 4. Mervyn Sebastian Abreo 5. Roy de Souza alias Maria Roy do Rosario de Souza ....Opponents

PUBLIC NOTICE

To all Opponents / Legal Heirs / any other interested parties

Whereas the applicant Cynthia Acanthe, R/o H. No. 4/21-A, Tabra Vaddo, Saligao, Bardez, Goa has applied for mutation under section 96 of L.R.C. 1968 to include her name in occupant column of Sy. No. 19/1 of Village Parra for Plot C an area admeasuring 99 sq, mtrs as Co-oocupant as per Deed of Sale registered under registration No. BRZ-1-3689-2022 dated 25.08.2022 executed before Civil Registrar Bardez link document order dated 26.07.2013 in Inventory proceeding No. 372/12/B passed in the Court of Civil Judge Senior Division B Court at Mapusa, Goa

Whereas, the notices in Form no. X were sent to all the interested parties by registered Ad. However some notices could not be served and returned unserved with postal remark expired, incomplete address, house locked, not known, insufficient address and party out of station etc.

And whereas, the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.

Mapusa, Dated: 17/03/2025
Sd/- **Saiesh S. Naik** (Seal)
Joint Mamlatdar VI of Bardez Taluka, Mapusa

CHANGE IN NAME

I, **Shri. Menino Manuel Leandro Dias,** Resident of H NO 1215/1 2ND Bairo Segundo Bairo Santa Cruz Tiswadi , North Goa, 403005, Goa, INDIA, hereby change my name from **Menino Dias** to **Menino Manuel Leandro Dias.** Hereafter in all my dealings and documents, my name will be known by **Menino Manuel Leandro Dias.**

NOTICE

My Mother **Late Anita Maria Rodrigues** was owning **Hyundai Santro Car** bearing **Reg. No. GA-06-A-9007.** After her death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Date: 18.03.2025 Sd/-
Fatima Souza
H.No. 21/3, Lane No. 10, Behind Cottage Hospital, Chicalim, Mormugao, South Goa 403711
Sandeep Ads

CHANGE IN NAME

I, **PUNAM ASHISH THAKUR DESAI** r/o H.NO.1783 HOUSING BOARD COLONY HARVALEM, SANQUELIM BICHOLIM, North Goa, 403505, like to change my name from **PUNAM KRISHNA PHADKE** to **PUNAM ASHISH THAKUR DESAI** Hereafter in all my dealings and documents I will be known by the name **PUNAM ASHISH THAKUR DESAI.**

CHANGE OF NAME

I, **VINITA VAZ** Resident of H.No. 1, Molla, Cavorim, Chandor Salcete Goa has change my name from **VINITA CASTRO COTTA CRUZ** to **VINITA VAZ** Hereinafter in all my dealings and documents I will be known by new name of as **VINITA VAZ.**

NOTICE

My Mother **Late Anita Maria Rodrigues** was owning **Honda Dio Scooter** bearing **Reg. No. GA-06-C-6007 & Skoda Fabia Car** bearing **Reg. No. GA-06-D-8006.** After her death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Date: 18.03.2025 Sd/-
Donnie Osterio Rodrigues
H.No. 21/3, Lane No. 10, Behind Cottage Hospital, Chicalim, Mormugao, South Goa 403711
Sandeep Ads

IN THE COURT OF JOINT MAMLATDAR VI OF BARDEZ TALUKA AT MAPUSA, GOA
Mutation Case No: 100324 Village: Parra

Cynthia Acanthe, R/o H. No. 4/21-A, Tabra Vaddo, Saligao, Bardez, Goa .....Applicant
V/s
1. Emilia Bella Lalita Abreo alias Emelia Bella Lalita Abreo 2. Gavin Nigel Rodrigues alias Gavin Rodrigues 3. Maria Helena Rodrigues 4. Mervyn Sebastian Abreo 5. Roy de Souza alias Maria Roy do Rosario de Souza ....Opponents

PUBLIC NOTICE

To all Opponents / Legal Heirs / any other interested parties

Whereas the applicant Cynthia Acanthe, R/o H. No. 4/21-A, Tabra Vaddo, Saligao, Bardez, Goa has applied for mutation under section 96 of L.R.C. 1968 to include her name in occupant column of Sy. No. 19/11 of Village Parra for Plot D an area admeasuring 246 sq, mtrs as Co-oocupant as per Deed of Sale registered under registration No. BRZ-1-3688-2022 dated 25.08.2022 executed before Civil Registrar Bardez link document order dated 26.07.2013 in Inventory proceeding No. 372/12/B passed in the Court of Civil Judge Senior Division B Court at Mapusa, Goa

Whereas, the notices in Form no. X were sent to all the interested parties by registered Ad. However some notices could not be served and returned unserved with postal remark expired, incomplete address, house locked, not known, insufficient address and party out of station etc.

And whereas, the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given the notice of the said mutation entry and called upon to submit to me their objections if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying officer.

Mapusa, Dated: 17/03/2025
Sd/- **Saiesh S. Naik** (Seal)
Joint Mamlatdar VI of Bardez Taluka, Mapusa

नावातील बदल

मी, **जॉन व्हिक्टर,** राहणार डी-२०५, सेंट आगुस्तीन टॉवर्स, ओल्ड गोवा, गोवा ४०३४०२ माझे नाव **जॉन व्हिक्टर सॅम्यूएल** हे दुरुस्त करून **जॉन व्हिक्टर** असे केले आहे. येथून पुढे माझे सर्व व्यवहार व दस्तावेजांमध्ये मी माझ्या **जॉन व्हिक्टर** या नवीन नावाने ओळखला जाईन.

द फिलोमेना को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.
मोलोका - मेरशी, तिसवाडी - गोवा
नोंदणी क्रमांक : एआरसीएस/ सीझेड/ एचएसजी /404 -(ब)/ गोवा
दिनांक 9.4.1999
परिशिष्ट 15
(उपनियम क्रमांक 31 अंतर्गत)

सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मृत सदस्याच्या शेअर्सच्या हस्तांतरणावर आणि हितसंबंधांवर दावे किंवा आक्षेप मागवणारी सूचना

सूचना

फिलोमेना को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.चे सदस्य असलेले **श्री. टोम ऑलिव्हेरा,** पत्ता: मोलोका, मेरशी, तिसवाडी, गोवा येथे आहे आणि सोसायटीच्या इमारतीत त्यांचा गाळा क्रमांक 16 आहे व त्यांचे **21 फेब्रुवारी 2025** रोजी कोणतेही नामांकन न करता निधन झाले.

सोसायटी याद्वारे त्याच्या वारसदारांकडून किंवा वारसांकडून किंवा इतर दावेदारांकडून किंवा दावेदारांकडून/आक्षेप घेणाऱ्यांकडून सोसायटीच्या भांडवलात/मालमत्तेमध्ये मृत सदस्याचे शेअर्स आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यासाठी त्यांच्या/तिच्या/त्यांच्या दाव्यांचे/आक्षेपांच्या प्रती आणि इतर पुरावे मागवत आहे. जर वर नमूद केलेल्या कालावधीत कोणतेही दावे प्राप्त झाले नाहीत, तर सोसायटीला सोसायटीच्या उपनियमांनुसार प्रदान केलेल्या पद्धतीने सोसायटीच्या भांडवलात/मालमत्तेमध्ये मृत सदस्याचे शेअर्स आणि हितसंबंध हाताळण्यास मुक्त राहील. दावेदारांकडून/आक्षेप घेणाऱ्यांकडून तपासणीसाठी सोसायटीच्या नोंदणीकृत उपनियमांची प्रत सोसायटीच्या इमारतीच्या गाळा क्रमांक 19 आणि 20 (मोझीन सुपरमार्ट) येथे (सोमवार ते शुक्रवार) याकाळात सकाळी 9 ते दुपारी 12.30 या वेळेत ही सूचना प्रकाशित झाल्यापासून त्याची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

द फिलोमेना को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. च्या वतीने आणि त्यांच्या वतीने.

ठिकाण: मोलोका-मेरशी
दिनांक: 15.02.2025

सही /-
मुरली नाईक
मानद सचिव